**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक:१७/०३/२०२६**

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**दाखल कार्यपत्रिका**

**विषय क्र. १९९४त्वर्य**

प्रभाग क्र. ९ बाणेर स.नं. १९८ ते २०५, २०६ येथे क्रीडांगण विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. V K CONSTRUCTION यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४२०८८७/- पेक्षा १५.३०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७१३२४९१=२९ अधिक जी.एस.टी. र.रु.१२८३८४८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३४८०५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२७४५०/- पर्यंत अशी एकुण र.रु.८४७८५९४=२९ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१९८०, दि. १३/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.१९९५त्वर्य**

झोन क्र.४ मधील ओढ्यावरील साईट भिंती वरील लोखंडी सरंक्षक जाळया बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. YOHAN ENGINEERS AND CONTRACTORS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३८५८७१/- पेक्षा ३३.९९०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२२३५०१३=४५ अधिक जी.एस.टी. र.रु.४०२३०२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४६२०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२६४१९३५=४५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१९८४, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.१९९६त्वर्य**

लोहगाव वाघोली रोड रिपब्लिक सोसायटी ते कावेरी हॉटेल मोठ्या व्यासाची मलवाहिनी विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s Ganpat D Dhamdhere यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३००५६७/- पेक्षा ३२.६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५९४५८२=१६ अधिक जी.एस.टी. र.रु.१००७०२५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१९१८२९/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८५९५/- पर्यंत अशी एकुण र.रु.६८०२०३१=१६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१९८५, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.१९९७त्वर्य**

हडपसर मध्ये काळे बोराटेनगर पुणे मिरज लाईन गेट क्र. ८ या ठिकाणी पादचारी भुयारी मार्गाच्या बांधकामाकरिता मध्य रेल्वे पुणे यांना रक्कम रुपये ५,३७,९७,११८.०२/- (अक्षरी रक्कम रुपये पाच कोटी सदोतीस लाख सत्याण्णव हजार एकशे अठरा दशांश शून्य दोन फक्त) इतकी रक्कम रेल्वे विभाग पुणे यांना टप्प्या टप्प्याने अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१९८६, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.१९९८त्वर्य**

प्रभाग क्रमांक ५५ मधील सिंहगड रोड वडगांव बु. स.नं. ३५ ते ४० (पार्ट) येथील जागेवर श्री छत्रपती शिवाजीराजे भोसले सांस्कृतिक भवन व कला मंदिर येथे विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MORESHWAR ELECTRICAL CORPORATION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४१४१५२/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ५.११% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९८४१८८=८३ अधिक जी.एस.टी. र.रु.१४३७१५४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.९४२१३४२=८३ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९८७, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.१९९९त्वर्य**

पुणे मनपाचे परिमंडळ क्र.१, २ व ३ मधील जुन्या सिग्नलची वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. NUCLEONICS TRAFFIC SOLUTIONS PVT LTD यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.८८३७८१०/- (अधिक जी.एस.टी.) च्या ०.००% अंदाजपत्रका प्रमाणे) असल्याने पूर्वगणकपत्रक मधील आयटम क्र. १ र.रु.२२०३२००/-, आयटम क्र. २ र.रु.१८०००००/- आयटम क्र. ३ र.रु.४८३४६१०/- असे एकूण र.रु८८३७८१०/- होत आहे परंतु जागेवरील परिस्थिती व तांत्रिक कारणास्तव आयटम क्र.३ ची र.रु.४८३४६१०/- पैकी र.रु.२००००००००/- पर्यंत काम करून घेण्यात येईल तरी निविदा र.रु.८८३७८१०/- च्या (०.००% अंदाजपत्रकाप्रमाणे) रु.८८३७८१०/- अधिक जी.एस.टी. र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- अधिक सल्लागार शुल्क र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.६००३२००/- पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (०९/१०/२०२५) पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९८८, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०००त्वर्य**

परिमंडळ ४ व ५ मधील जुन्या सिग्नलची वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. NUCLEONICS TRAFFIC SOLUTIONS PVT LTD यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.३८८०००००/- (अधिक जी.एस.टी.) च्या ०.००% अंदाजपत्रका प्रमाणे) असल्याने पूर्वगणकपत्रक मधील आयटम क्र. १ र.रु.१०८०००००/-, आयटम क्र. २ र.रु. ९००००००/- आयटम क्र. ३ र.रु. १५००००००/- असे एकूण र.रु.३४८०००००/- होत आहे परंतु जागेवरील परिस्थिती व तांत्रिक कारणास्तव आयटम क्र. ३ ची र.रु. १५००००००/- पैकी र.रु ७००००००/- पर्यंत काम करून घेण्यात येईल तरी निविदा र.रु.३४८०००००/- च्या (०.००% अंदाजपत्रकाप्रमाणे) पैकी र.रु. २६८०००००/- अधिक जी.एस.टी. र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२६८०००००/- पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (२९/१०/२०२५) पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९८९, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००१त्वर्य**

मा. महापौर, मा.उप महापौर, मा. सभागृह नेते कार्यालय, मा. स्थायी समिती अध्यक्ष कार्यालय, मा. विरोधी पक्ष नेते कार्यालय, विविध पक्षांचे गटनेता यांची कार्यालये या ठिकाणी कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ पुरविणे हे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये ठेकेदार

मे.जी.आय.एस. वर्ल्ड हॉस्पिटॅलिटी सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेकडून दि.०१/०३/२०२६ रोजी पासुन ते दि.२८/०२/२०२७पर्यंत (१ वर्षाकरिता) मा. मुख्य कामगार अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या दरानुसार काम करुन घेणेस तसेच कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० कंत्राटी कामगारांच्या किमान वेतना मध्ये वेळोवेळी होणारी वेतन वाढ आदा करणेस व त्याच्यांशी करारनामा करणेस व दि.०१/०३/२०२६ रोजी पासुन बिल अदा करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१९९०, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००२त्वर्य**

पुणे येथील मुंढवा केशवनगर व खराडी बायपास रस्त्यावरील महात्मा फुले चौक या ठिकाणी ग्रेड सेपरेटर बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. एस. एम. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून पुगप र. रु. १२०,११,५९,८८७/- (लमसम रक्कम) करिता सर्वात कमी रक्कमेचे (सी-फॉर्म पद्धतीने) र.रु.१२६,६३,३६,१०३/- (तडजोडीने) पर्यत अधिक संकीर्ण काम र.रु.९,४२,५३,६८९/- (शेड्यूल बी प्रमाणे) पर्यंत काम करून घेणेस अधिक १८ % दराने जी.एस.टी. र.रु.२४,४९,०६,१६३/- (कामाची रक्कम + संकीर्ण काम रक्कम अशा एकूण रक्कमेवर) अधिक गुणवत्ता तपासणी शुल्क र.रु. ४३,०२,३८५/- अधिक रॉयल्टी चार्जेस र. रु.८०,०८,८९१/- पर्यंत अदा करणेस व निविदा अटी शर्तीनुसार भाववाढ आणि विशेष भाववाढ (स्टार रेट) सूत्रानुसार फरक अदा/ कपात करणेस अधिक Volume no.II Chapter-7, Schedule of Variation नुसार पुलाच्या पायाच्या पातळीत, पुलाचे छताच्या क्षेत्रफळामध्ये व पुलाच्या पोहोच रस्त्याच्या क्षेत्रफळामध्ये तसेच approach मध्ये येणारे मेट्रो Foundation मध्ये बदल झाल्यास निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने होणारी रक्कम अदा / कपात करणेस तसेच शासनाच्या धोरणानुसार जी.एस.टी. मध्ये बदल झाल्यास त्यानुसार त्याची रक्कम अदा/ कपात करणेस अधिक Volume I, clause 21, page -16 नुसार जादा बाबींची रक्कम अदा करणेस तसेच मान्य निविदा अटी शर्तीनुसार त्यांचे बरोबर करार करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१९९१, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००३त्वर्य**

CIIT प्रशिक्षण केंद्र, पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर येथे विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. OMKAR ELECTRICALS AND TECHNICAL SERVICES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३०३०७८६/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १७.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५१२५२१=५९ अधिक जी.एस.टी. र.रु.४५२२५४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२९६४७७५=५९ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९९२, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००४त्वर्य**

पुणे पेठ कोथरूड स. नं. ६९,७० या ठिकाणी ग. दि. माडगूळकर स्मारक येथे वातानुकूलित यंत्रणा पुरविणे, बसविणे व चालू करून देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Sarthak Engineers यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७१४४९६/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा २.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६५४६६३३=६ अधिक जी.एस.टी. र.रु.११७८३९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.७७२५०२७=६ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९९३, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००५त्वर्य**

बाणेर नॅशनल हायवे लगत हॉटेल सदानंद ते ननवरे ब्रिजपर्यंत १८ मी.डी.पी. रस्ता विकसनातील एम.एस.ई.बी. चे पोल शिफ्ट करून अंडरग्राउंड केबल टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. OMKAR ELECTRICALS AND TECHNICAL SERVICES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३७१८५/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा २१.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३४३१३८=९७ अधिक जी.एस.टी. र.रु.६०१७६५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३९४४९०३=९६ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विदयुत/१९९४, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००६त्वर्य**

कोंढवा खुर्द शिवनेरी नगर ते कुमार पृथ्वी दरम्यान ताब्यात आलेल्या रस्त्यांचे विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DHANRAJ ASPHALT COMPANY यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४१७४७६१/- पेक्षा १६.३५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४९२१८७=५८ अधिक जी.एस.टी. र.रु.६२८५९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.३७८३२/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३५६९०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४१९४३०३=५८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१९९५, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००७त्वर्य**

उप-आयुक्त क्रमांक ३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयामधील विवध उद्यानांत होर्टीकल्चर विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NISARGLAND SCAPE PVT. LTD. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३८८८६८/- पेक्षा १८.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७४५३२१=९७ अधिक जी.एस.टी. र.रु.४९४१५८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३२३९४७९=९७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उदयान/१९९६, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००८त्वर्य**

बिबवेवाडी स्मशानभूमीमध्ये सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE ABHI CONSTRUCTIONS AND FABRICATION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४५६६३६०/- पेक्षा २७.३७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३१६५४७=२७ अधिक जी.एस.टी. र.रु.५९६९७९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२८२६८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५५३८५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३९९७१७९=२७ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१९९७, दि. १७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२००९त्वर्य**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने दि. १०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे मे. द्वारिका लाईट अँड साउंड, यांच्याकडून करून घेण्यास व त्यानुसार त्यांना बिल अदा

करण्यास खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१९९९, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

१) दि. १०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे मे. द्वारिका लाईट अँड साउंड, यांच्याकडून करून घेण्यास व त्यानुसार करण्यात आलेल्या तात्पुरत्या प्रकाश व विद्युत विषयक कामांची देयके खाली दिलेल्या तक्त्यानुसार

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव | कामाचे वर्णन | रक्कम रुपये जीएसटी सह |
|---|---|---|---|
| १ | मे. द्वारिका लाईट अँड साउंड | दि. १०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे करणे | 1,89,90,210.00 |

एकूण रक्कम रुपये 18990210.00/- (एक कोटी एकोण नव्वद लाख नव्वद हजार दोनशे दहा फक्त जीएसटी सह) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये संबंधीत ठेकेदाराला बील आदा करणेस मान्यता मिळणेस, त्यासाठी त्यांचे समवेत कोणताही करारनामा न करणेस तसेच कोणतीही अनामत रक्कम न घेणेस.

२) वरील देयके बजेट कोड RE27A185 आणि RE 27A113 वर खर्ची टाकणेस.

३) दि. १०/३/२०२६ ते ३०/३/२०२६ दरम्यान होणाऱ्या महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धासाठी लाईट, साउंड व विद्युत विषय कामे मे. द्वारिका लाईट अँड साउंड यांचे मार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने करणेस आणि त्याचे बिल अदा करणेस.

**विषय क्र.२०१०त्वर्य**

रामटेकडी पाण्याची टाकी येथे स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PRAJWAL ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२५३५१००/- पेक्षा ४.८१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४१३१६१=६९ पर्यंत अधिक जीएसटी र.रु.४३४३६९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८४४०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२८५५९७०=६९ तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३०००००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/२०००, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०११त्वर्य**

प्रभाग क्र. ३८ क मधील सर्वे नं. २२ येथील अमेनीटी स्पेसच्या जागेवर बहुउद्देशीय इमारत व क्रीडा संकुल उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. Chandrai Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३७२१७/- पेक्षा २२.९५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२६४७७५=७ अधिक जी.एस.टी. र.रु.५८७६६०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.३८५२४३५=७ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००१, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१२त्वर्य**

पुणे शहरातील परिमंडळ क्र. ४ अंतर्गत दवाखाने, रुग्णालय व प्रसूतीगृह येथे अग्निशामक यंत्रणेची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Aditya Infrasafety Solutions यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२३६९५७/- पेक्षा १७.७०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४८७०१५=६१ अधिक जी.एस.टी. र.रु.६२७६६३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४११४६७८=६१ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००२, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१३त्वर्य**

पुणे शहरातील परिमंडळ क्र.०२ अंतर्गत दवाखाने, रुग्णालय व प्रसूतीगृह येथे अग्निशामक यंत्रणेची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. BLAZZE SAFETECH PVT LTD यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.४२३६९२७/- पेक्षा ७.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९४०३४२=११ अधिक जी.एस.टी. र.रु.७०९२६२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकुण र.रु.४६४९६०४=११ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००३, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१४त्वर्य**

नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाची नवीन इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. A V S ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२५३८२६१/- पेक्षा ५.७०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३९३५८०=१२ अधिक जी.एस.टी. र.रु.४३०८४४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४६७०/- पर्यंत अशी एकुण र.रु.२८२९०९४=१२ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००४, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१५त्वर्य**

नव्याने समाविष्ट झालेल्या परिमंडळ ४ अंतर्गत मांजरी, शेवाळवाडी, झगडेवस्ती गावातील स्मशानभूमी येथे दुरुस्ती व सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Aadarsh Bharat Enviro Pvt.Ltd. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४६४९९७/- पेक्षा २८.१५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६०८२१००=३४ अधिक जी.एस.टी. र.रु.१०९४७७८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८८१५/- पर्यंत अशी एकुण र.रु.७१८५६९३=३४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००५, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१६त्वर्य**

बिबवेवाडी येथील सीताराम आबाजी बिबवे शाळेची उर्वरित कामे पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE ABHI CONSTRUCTIONS AND FABRICATION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२२८७७०/- पेक्षा २८.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३०४४७१४=४ अधिक जी.एस.टी. र.रु.५४८०४९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१००३५/- पर्यंत अशी एकुण र.रु.३६०२७९८=४ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/२००६, दि.१७/०३/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१७त्वर्य**

पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्प अंतर्गत कल्याणी नगर पूल ते मुंढवा पूल (स्ट्रेच १०व ११) लगतच्या ३०.०० मीटर डी.पी रस्त्याने बाधित खाजगी मिळकत धारकांच्या जागेचे संपादन व हस्तांतरण करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे नियम १२६ (2) अन्वये व मुंढवा स.नं. ८१ (पै), ८१/२६, ८२/५, ८७/२अ, ८७/२८/१, ८७/२क, ९२/१, ९२ (पै), ९२/११, ९२/१३, ९२/१३ब व ९३ (पै) येथिल मंजूर विकास आराखड्यानुसार ३०.०० मी. डी.पी रस्ताने बाधित क्षेत्राचे आरक्षित साधारण एकूण २१२८२ चौ.मी. क्षेत्राचे संपादन व हस्तांतरण ची कार्यवाही सुरु करणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१६९४, दि.०६/०२/२०२६ चे पत्र.

**विषय क्र.२०१८त्वर्य**

पुणे पेठ शिवाजीनगर पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारती मधील तळमजल्यावरील उत्तरेकडील PRO ऑफिस शेजारील जिन्याखालील रूम (गाळा) १० वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास मुदत वाढ देणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/१७३५, दि.११/०२/२०२६ चे पत्र.

१) पुणे पेठ शिवाजीनगर पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील तळमजल्यावरील उत्तरेकडील PRO ऑफिस शेजारील जिन्याखालील रूम (गाळा) चे क्षेत्रफळ ९.२९ चौ.मी. हि मिळकत १० वर्षे कालावधीसाठी (महाराष्ट्र महानगरपालिका स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्ट्याचे नूतनीकरण) नियम, २०२३ मधील नियम क्र.३ (२) अ (iii) (ब) अन्वये भाडेपट्ट्याच्या रकमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्ट्याच्या रकमेत ५ टक्क्यांनी वाढ करून (iii) (अ) नुसार त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रकमेत देखील वाढ करून) भाडेतत्वावर देणेकरीता सदर गाळ्याचे विद्यमान भाडेकरू पुणे महानगरपालिका निवृत्त सेवक संघ यांना मासिक भाडे र.रु.५९७/- अधिक वस्तू व सेवा कर या रकमेप्रमाणे मा. मुख्य सभा मान्यता दिनांकापासून पुढील १० वर्ष कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेकरीता मुदतवाढ देणेस, तसेच नियमानुसार शासकीय कर भरून घेणेस व त्यांचेसोबत नोंदणीकृत करारनामा करणेस,

२) पुणे महानगरपालिका निवृत्त सेवक संघ यांचेकडून र.रु.५,०००/- इतकी सुरक्षा अनामत भरून घेणेस.

**विषय क्र.२०१९त्वर्य**

प्राथमिक शिक्षण विभाग पुणे मनपाकडील करार शिक्षक (मराठी माध्यम) मुदत वाढ मिळणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राशिवि/१८८२, दि.०९/०३/२०२६ चे पत्र.

१) प्राथमिक शिक्षण विभागाकडील मराठी माध्यम १०६ करार शिक्षक यांना दि. १८/०३/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेर मुदतवाढ मिळणेस.

**विषय क्र.२०२०त्वर्य**

प्राथमिक शिक्षण विभाग पुणे मनपाकडील करार शिक्षक (इंग्रजी माध्यम) मुदत वाढ मिळणेसाठी. खालील बाबीस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राशिवि/१८८३, दि. ९/०३/२०२६ रोजीचे पत्र.

१) प्राथमिक शिक्षण विभागाकडील इंग्रजी माध्यम २५ करार शिक्षक यांना दि. १८/०३/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेर मुदतवाढ मिळणेस.

**विषय क्र.२०२१त्वर्य**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शिक्षण विभागाकडील विशेष मुलांची शाळेसाठी एकवट मानधनावर करार पद्धतीने नियुक्त केलेल्या शिक्षकांना मुदत वाढ मिळणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्राशिवि/१८९६, दि. १०/०३/२०२६ रोजीचे पत्र.

१) प्राथमिक शिक्षण विभागाकडील विशेष मुलांच्या शाळेतील २ करार शिक्षकांना दि. २३/०२/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेर मुदतवाढ मिळणेस.

**विषय क्र.२०२२त्वर्य**

**मा. सौ.रुपाली धाडवे व मा. सौ.मयुरी कोकाटे यांचे दि.१७/०३/२०२६ चे पत्र.**

शहरीकरणामुळे हृदयरोगाचे प्रमाणामध्ये वाढ होताना दिसून येत आहे. तरुण पिढीमध्ये हृदयरोग व उच्चरक्तदाब यामध्ये वाढ दिसून येत आहे. यावर उपाययोजना म्हणून कार्डीयाक जिम उभारणे काळाची गरज आहे. या अंतर्गत हृदयविकार असलेल्यांना व हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या सर्व रुग्णांना विशिष्ट प्रकारचा व्यायाम शिकवला जाऊन ते व्यायाम नित्यनियमाने सुरु केल्यास त्याचा आरोग्यावर चांगला परिणाम होऊ शकतो.

तरी प्रभाग क्र. ३९ क मध्ये जागा उपलब्ध असल्याने त्याठिकाणी कार्डीयाक जिम खात्यामार्फत चालू करण्यात यावी.

**विषय क्र.२०२३त्वर्य**

**मा. सौ.रुपाली धाडवे व मा. विशाल धनवडे यांचे दि.१७/०३/२०२६ चे पत्र.**

पुणे मनपाचा येरवडा येथील जुना डांबर प्लांट बंद पडत असल्याने सन २०२५ मध्ये १६० tph चे दोन प्लांट installation आणि maintenance साठी B-2 पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर निविदा Parkar कंपनी L1 आली आहे. सदर कंपनी ही pollution free certificate धारक आहे.

येरवडा येथे एक प्लांट बसला असून दुसरा डांबर प्लांट शहराच्या दक्षिण भागात म्हणजेच शिंदेवाडी जकात नाक्याच्या जागेत बसविल्यास शहरी हद्दीपासून दूर आजूबाजूच्या ७ ते ८ क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रातील रस्ते चांगले सुस्थितीत ठेवण्यासाठी वेळेत डांबर उपलब्ध होईल. बहुसंख्य समाविष्ट गावातील रस्त्यांची पण दुरुस्ती वेगात होईल.

**विषय क्र.२०२४त्वर्य**

**मा. सौ. रुपाली धाडवे व मा. डॉ. दादा कोद्रे यांचे दि.१७/०३/२०२६ चे पत्र.**

तज्ञ सल्लागार मे. बिल्डोक्रिट कन्सल्टंट्स यांनी यापूर्वी विविध ठिकाणी शासकीय व निमशासकीय विभागांकडे मोठ्या प्रमाणावर तज्ञ सल्लागार म्हणून कामे केलेली आहेत.

त्यामुळे पुणे महानगरपालिकेकडील विविध कामे करणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या तज्ञ सल्लागार यादीमध्ये मे. बिल्डोक्रिट कन्सल्टंट्स (M/S.BUILDOCRETE CONSULTANTS) यांचे नाव यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

**विषय क्र.२०२५त्वर्य**

**मा. प्रशांत जगताप व मा. विशाल धनवडे यांचे दि.१७/०३/२०२६ चे पत्र.**

श्रीमती कळसकर यांना तत्कालीन मा.महा. आयुक्त यांनी क्र.मआ/सा.प्र. /८८७६, दि.०१/०१/२०१९ अन्वये पुणे स्मार्ट सिटी कडील मुख्य वित्त अधिकारी या पदाची अतिरिक्त कामकाज करणेबाबत आदेशित केले होते. पुणे स्मार्ट सिटीच्या बोर्डाने केलेल्या ठरावानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखापाल व वित्त अधिकारी श्रीमती कळसकर उल्का यांना मानधन देण्यास मान्यता दिली आहे. त्यास सेवाविनियम ७१ नुसार पश्चात मान्यता मिळणे बाबत.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**